279 286 266

महाराष्ट्र टाइम्स

16 जाने. 2014

# कमला कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

▶▶ कोल्हापूर टाइम्स टीम

'विद्यार्थिनीमध्ये चांगल्या क्षमता असतात. स्वत:च्या क्षमतांची ओळख करून घ्या. स्पर्धा परीक्षेची भिती बाळगू नये. स्वत:मधील न्यूनत्वाची भावना कायमची नष्ट करावी. जे ध्येय निश्चित केले आहे, त्याचा पाठपुरावा करा' असे आवाहन प्रा. जॉर्ज क्रूझ यांनी केले. कमला कॉलेजमध्ये अनुसूचित जाती, जमाती, विशेष मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी दहा दिवसांचे मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांचे भाषण झाले. जॉर्ज क्रूझ यांनी विद्यार्थिनींनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमावेळी प्रा. अनिल घस्ते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एन. एस. शिरोळकर यांनी आभार मानले.